॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ०१ जुलै २०२६(प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या मास्टर ऑफ सोशल वर्क (एम.एस.डब्ल्यू.) अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत २८ जून २०२६ पर्यंत होती. विद्यार्थ्यांच्या सोयीचा विचार करून आता अर्ज भरण्याची अंतिम मुदत रविवार, दि. ५ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती विद्यापीठाने दिली आहे.
सामाईक प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एम.एस.डब्ल्यू या अभ्यासक्रमासाठीची सामाईक प्रवेश परीक्षा (CET) शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या दिवशीच पात्र उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत (Personal Interview) देखील घेतली जाणार आहे.विद्यापीठाने दिलेल्या सूचनेनुसार, लेखी परीक्षा आणि वैयक्तिक मुलाखत या दोन्ही प्रक्रिया माहितीपत्रकात नमूद केलेल्या तसेच परीक्षार्थींनी अर्ज करताना निवडलेल्या परीक्षा केंद्रावरच पार पडतील. एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी सुधारित वेळापत्रकाचा लाभ घेत वेळेत अर्ज सादर करावा तसेच प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्व सूचना, पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि इतर माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरून तपासून घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ०१ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी